# मुंबई विद्यापीठ

**परिपत्रक क्र. मशिमाक/ ७ /२०२१–२०२२**

विषय :— कोविड–१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव उद्‌भवल्याने विद्यापीठाने मंजुर केलेल्या जाहिरातीच्या मसुद्यास मुदतवाढ देणेबाबत.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अनुदानीत व विनाअनुदानीत, अल्पसंख्यांक व विनाअल्पसंख्यांक कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापकशास्त्र, नृत्यशास्त्र, होम सायन्स, सोशलवर्क, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापनशास्त्र, औषध निर्माणशास्त्र, स्थापत्यशास्त्र, हॉटेल व्यवस्थापनशास्त्र, वास्तुकलाशास्त्र आाणि एम.सी.ए. या महाविद्यालयांचे संस्थेचे अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, राज्यात कोविड–१९ चा प्रादुर्भावाचा प्रसार रोखण्यासाठी महाराष्ट्र शासनाने घातलेले निर्बंध व टाळेबंदी या कारणास्तव विद्यापीठाने दिनांक १ नोव्हेंबर २०१९ ते २० मार्च, २०२० या कालावधीत महाविद्यालयातील शिक्षकीय पदे भरण्यासाठी मंजूर केलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने पुढील प्रक्रिया पार पाडण्यासाठी उद्‌भवलेल्या समस्येचे गांभीर्य लक्षात घेता सदर प्रक्रियेच्या कालावधीस मुदतवाढ करण्याबाबतची बाब मा. विद्यापीठ प्रशासनाच्या विचाराधीन होती.

त्याअनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अनुदानीत व विनाअनुदानीत, अल्पसंख्यांक व विनाअल्पसंख्यांक कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापकशास्त्र, नृत्यशास्त्र, होम सायन्स, सोशलवर्क, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापनशास्त्र, औषध निर्माणशास्त्र, स्थापत्यशास्त्र, हॉटेल व्यवस्थापनशास्त्र, वास्तुकलाशास्त्र आणि एम.सी.ए. या महाविद्यालयांचे संस्थेचे अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांना मा. विद्यापीठ प्रशासनाच्या आदेशान्वये सूचित करण्यात येते की, दिनांक १ नोव्हेंबर २०१९ ते २० मार्च, २०२० या कालावधीत शिक्षकीय पदे भरण्यासाठी जाहिरातीच्या मसुद्यास विद्यापीठाने दिलेल्या मंजूरीच्या अनुषंगाने पुढील निवड प्रक्रिया पार पाडण्याकरिता **दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे याची नोंद घ्यावी.**

तरी सदर परिपत्रकान्वये सुचित करण्यात येते की, उपरोक्त मुदतवाढी नुसार संबंधित महाविद्यालयाने सदरहू प्रक्रिया विहित कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करण्यात यावी.

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– १६ सप्टेंबर, २०२१

(डॉ. बळीराम गायकवाड)
कुलसचिव (प्रभारी)
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अनुदानीत व विनाअनुदानीत, अल्पसंख्यांक व विनाअल्पसंख्यांक कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापकशास्त्र, नृत्यशास्त्र, होम सायन्स, सोशलवर्क, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापनशास्त्र, औषध निर्माणशास्त्र, स्थापत्यशास्त्र, हॉटेल व्यवस्थापनशास्त्र, वास्तुकलाशास्त्र आाणि एम.सी.ए. या महाविद्यालयांचे संस्थेचे अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीस्तव सादर :—

१. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे – ४११ ००१.
२. मा. सह संचालक, उच्च शिक्षण, महापालिका मार्ग, मुंबई विभाग, मुंबई – ४०० ००१.
३. मा. सह संचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल – ४१० २०६.
४. मा. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
५. मा. प्र. कुलगुरूंचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
६. स्वीय सहायक, कुलसचिव (प्रभारी), मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
७. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).